# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक १४ मार्च, २०१३
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचना (असल्यास).**

**तीन : लक्षवेधी सूचना-(म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

(१) **(मंगळवार, दिनांक १२ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) -**

**सर्वश्री. विनायक राऊत,** विजय सावंत, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"कुडाळ तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) पणदुर-मयेकरवाडी आणि डीगस-सुर्वेवाडीत दिनांक २३ फेब्रुवारी, २०१३ रोजी वा त्या दरम्यान मध्यरात्री ३ च्या सुमारास ३ उन्मत जंगली हत्तींनी हैदोस घालून श्री. बी. बी. सावंत यांचे संपूर्ण घर उध्वस्त करुन मालमत्तेचे अतोनात नुकसान करणे, पणदुर-मयेकरवाडी व डीगस-सुर्वेवाडी परिसरात ग्रामस्थांना जंगली हत्ती, गवे व रेडे यांचा नियमीत होणारा त्रास, त्यातून ग्रामस्थांच्या बागा व शेती उध्वस्त होण्याच्या सर्रास घडत असलेल्या घटना, ग्रामस्थांनी गवे, रेडे व हत्ती यांचा बंदोबस्त करावा म्हणून वनक्षेत्रपाल कडावल वनविभाग यांच्याकडे वारंवार मागणी करुनही वनक्षेत्रपालांनी सुरक्षिततेचे उपाययोजना न करणे, परिणामी ग्रामस्थांत व शेतकरी वर्गात वाढते भितीचे, असुरक्षिततेचे व चिंतेचे वातावरण, शासनाने तातडीने जंगली हत्ती, गवे, रेडे यांचा बंदोबस्त करण्यासाठी करावयाची उपाययोजना."

(२) **सर्वश्री. विक्रम काळे ,** हेमंत टकले, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री. जयवंतराव जाधव, किरण पावसकर, अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. प्रकाश बिनसाळे, नरेंद्र पाटील, राणा जगजितसिंह पाटील **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयातील यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया फेब्रुवारी, २०१३ पासून बंद करण्यांत येणे, राज्यातील व परराज्यातील शेकडो रुग्ण या शस्त्रक्रियेच्या प्रतिक्षा यादीवर असणे, परंतु शस्त्रक्रिया बंद केल्यामुळे गरीब व गरजू रुग्णांच्या नातेवाईकांत पसरलेला तीव्र असंतोष, परिचारिका, प्रशिक्षणार्थी डॉक्टर व अवयवदान

कार्यक्रमातील तज्ञ यांच्यात असलेला विसंवाद, केईएम रुग्णालयांत परदेशातून प्रशिक्षण घेवून आलेले डॉक्टर्स असताना त्यांचा ज्ञानानुभांवंचा उपयोग करुन घेण्यास होत असलेली चालढकल, परिणामी या सेवेपासून आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेले रुग्ण वंचित राहणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया. "

(३) **श्री. रामदास कदम,** ॲड. अनिल परब **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"कल्याण-डोंबिवली येथे बांधकाम पूर्णत्वाचा दाखला न घेतलेल्या विकासकांकडे महापालिकेची जवळपास ५० कोटी रुपयांची असलेली थकबाकी, ज्या विकासकांना सन १९९६ ते २०१० या कालावधीत इमारत बाधण्यासाठी परवानगी देण्यात आली, त्यांनी इमारत बांधुन पूर्ण केल्या तसेच त्या विकुन त्यातुन पैसाही कमविला, मात्र बांधकाम पुर्ण झाल्यावर फ्लॅटची विक्री करतांना महापालिकेकडून बांधकाम पुर्णत्वाचा दाखला न घेताच अशा अनेक इमारतीत फ्लॅटधारक वास्तव्य करीत असणे, दाखला मिळाल्याशिवाय वास्तव्य करणे बेकायदा असणे, या थकबाकी वसुली केल्यास महापालिकेच्या तिजोरीत कोट्यावधी रुपयांची भर पडणार असुनही या वसुलीकडे महापालिका अधिकारी करीत असलेले दुर्लक्ष, सर्वसामान्य जनतेची विकासकांकडून होत असलेली फसवणूक, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन संबंधित विकासकांकडून थकबाकी वसुल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(४) **सर्वश्री. जयप्रकाश छाजेड,** संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, मोहन जोशी, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री.अनिल भोसले, जयवंतराव जाधव **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" राज्य परिवहन महामंडळामध्ये अपंग व्यक्तींना रोजगाराच्या व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी परिपत्रक क्र.४ अन्वये प्रत्येक स्थानकात एस.टी.डी. बूथचा परवाना देण्यात येणे, सदरहू परवान्यांची संपलेली मुदत न वाढविल्याने राज्यातील सुमारे साडेचार हजार अंध - अपंग व्यक्तींच्या कुटुंबियांचा चरितार्थ चालवायचा निर्माण झालेला प्रश्न, त्यांच्या कुटुंबियांवर ओढवलेली उपासमारीची वेळ, एसटीच्या अडीचशे आगारामध्ये सन १९९२ पासून अपंगांना एसटीडी बूथसाठी दिलेल्या स्टॉलची तात्काळ मुदतवाढ देऊन, गोरगरिब अपंग बुथ धारकांना न्याय मिळवून देण्याची गरज, यावर शासनाने केलेली कार्यवाही वा करावयाची उपाययोजना. "

(५) **सर्वश्री. विजय सावंत,** जयवंतराव जाधव **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक

महत्वाच्या बाबींकडे **फलोत्पादन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

" संपूर्ण कोकणपट्टीत सध्या सातत्याने बदलत असणारे हवामान, ढगाळ वातावरण काही वेळा सोसायट्याचा वारा व परिणामी आंबा फळाची होत असलेली प्रचंड घळ, सार्वत्रिकरित्या होत असलेली ही घळ वातावरणातील नेमक्या कोणत्या घटकामुळे होत आहे यांचे संशोधन कोकण कृषि विद्यापीठाने करणे आवश्यक असतानाही त्याकडे होणारे दुर्लक्ष, त्यातच आंबा पिकांवर थ्रिप्स रोग पसरलेला असल्याची फेब्रुवारी, २०१३ मध्ये उघडकीस आलेली माहिती, थ्रिप्स रोगाचा प्रादुर्भाव झालेला असल्याने आंबा काळवंडत असणे, परिणामी, आंबा बागादारांमध्ये वाढीस लागत असलेली असंतोषाची भावना, यासंदर्भात शासनाने तातडीने पाऊले उचलून या हंगामातील आंबा उत्पादन हातचे जाणार नाही यादृष्टीने कारावयाची तातडीची उपाययोजना व याबाबतची प्रतिक्रिया. "

(६) **सर्वश्री चंद्रकांत पाटील,** विनोद तावडे, भगवान साळुंखे, अशोक ऊर्फ भाई जगताप, चरणसिंग सप्रा **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

" शासनाने राज्याचे क्रीडा धोरण घोषित करतांना त्यात आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये ब्राँझ पदक पटकावलेल्या खेळाडूला राज्यसेवा परिक्षा न देता प्रथम श्रेणीची नोकरी देण्याचा निर्णय घेण्यात येणे, परंतू याची ठोस अंमलबजावणी झालेली नसणे, सन २००६ साली मेलबर्न येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेतील नेमबाजीमध्ये दोन सुवर्णपदके मिळविणाऱ्या तेजस्विनी सावंत ह्या खेळाडूस शासनाने प्रथम श्रेणी नोकरी देणे, परंतु त्यात वेतन श्रेणी कमी ठरविण्यात येणे, सन २०१० साली तेजस्विनी सावंत विश्वविजेती नेमबाज झाल्यानंतर शासनाने तिला पदोन्नती देण्याचे ठरविणे, परंतु तीन वर्षाचा कालावधी लोटला तरी अद्याप पदोन्नती मिळालेली नसणे, आंतरराष्ट्रीय नेमबाज राही सरनोबत, तसेच राष्ट्रीय पातळीवरील तलवारबाज उत्कर्षा मोटे, अशा अनेक खेळाडूंना अद्याप नोकरी न मिळणे, कबड्डीमध्ये विश्वचषक जिंकणाऱ्या खेळाडूंना प्रत्येकी १ कोटी रुपये देण्याचे शासनाने ठरवून देखील ते अद्याप देण्यात न येणे, यामुळे खेळाडूंच्या मनात शासनाप्रती निर्माण झालेली चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. "

**चार : विशेष उल्लेख (असल्यास)- (म.वि.प. नियम १०१-अ अन्वये)**

## मध्यंतर

पाच : **राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस).**

सहा : **सर्वश्री. विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री.रामनाथ मोते, सुमंतराव गायकवाड, ॲड.आशिष शेलार, ॲड. अनिल परब, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री.नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

" वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या संघटनांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी परिक्षेच्या कामावर बहिष्कार टाकला असणे, वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना ५ वा वेतन आयोग दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून लागू करणे, विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिल्याप्रमाणे राज्य शासनाने दिनांक १ जानेवारी, २००६ ते ३१ मार्च, २०१० या कालावधीतील ६ व्या वेतन आयोगाची ८० टक्के थकबाकी न देणे, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांना महागाई भत्ता न देणे, शिक्षकेत्तरांच्या आकृतीबंधाचा विषय गेली १३ वर्षे प्रलंबित असणे, कायम विना अनुदानित शाळांचा शब्द काढून टाकताना उच्च माध्यमिक शाळांना जाणीवपूर्वक वगळणे, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ च्या मुल्यांकनाच्या निकषामध्ये बदल करण्याचे मान्य करुनही कारवाई न होणे, दिनांक २८ नोव्हेंबर, २००६ च्या विना अनुदानित सेवा कालावधी वरिष्ठ निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याच्या निर्णयातून प्राथमिक, उच्च माध्यमिक शिक्षक व सर्व शिक्षकेत्तरांना वगळणे, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना देय वेतनवाढी ४ वर्षापासून बंद करणे, शिक्षकेत्तरांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू न करणे, वेतनेत्तर अनुदानाची मागील ८ वर्षांची थकबाकी नाकारणे, पटपडताळणीच्या अनुषंगाने बंद पडणाऱ्या शाळांमधील शिक्षक-शिक्षकेत्तरांना संरक्षण व समायोजन नाकारणे, गुणवत्तेच्या नावाखाली सेवेत असलेल्या इयत्ता ६ वी ते ८ वी च्या शिक्षकांसाठी पदवी प्राप्त करण्याची सक्ती करणे, विना अनुदानित शाळांचे मुल्यांकनाचे जाचक निकष शिथील करण्याचे आश्वासन देऊनही शासनाने कारवाई न करणे, विना अनुदानित शाळेत सेवेत असलेले सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण न देणे, परिणामी विना अनुदानित शाळेच्या शिक्षकांनी आत्मदहनाचा इशारा देणे, वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा परिक्षेच्या कामकाजावर बहिष्कार जाहीर केल्यामुळे राज्यातील विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये शासनाविषयी नाराजी निर्माण होणे, विद्यार्थी हिताचा विचार न करता शासनाने या विषयाकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी विद्यार्थी व पालक यांचेवर प्रचंड ताण व तणाव निर्माण होणे, राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या व विना अनुदानित शाळेमधील शिक्षकांच्या उक्त मागण्यांच्याबाबतीत तोडगा काढण्यास शासनास आलेले अपयश, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची उपाययोजना व याबाबतची

शासनाची भूमिका विचारात घेण्यात यावी. "

सात : **अर्धा तास चर्चा- म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -**

(१) **श्री. चंद्रकांत पाटील व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

" पश्चिम घाटातील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असलेल्या वनक्षेत्रात परदेशी झाडांच्या लागवडीमुळे जैव विविधता धोक्यात आली असणे, या प्रकारच्या झाडांच्या संदर्भात अनेक तज्ज्ञ किंवा अनुभवी शेतकरी यांच्याशी चर्चा केली असता हे वृक्ष स्थानिक परिस्थितीशी जुळवून घेत असले तरीही त्यापासून पर्यावरणाची हानीच करीत असल्याचे मत असणे, या वृक्षावर सहसा पक्षी न बसणे, किंवा घरटेही न बांधणे वन्य प्राणी अशा झाडाखाली आश्रय घेत नसणे, या झाडाखाली गवत किंवा अन्य वनस्पती उगवत नसणे, ह्या वृक्षाचे आयुर्मान कमी असणे, त्यामुळे भविष्यात अनेक समस्यांना सामोरे जावे लागणार असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

(२) **श्री.संदिप बाजोरिया व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"यवतमाळ जिल्ह्यातील हिवरी वन परिक्षेत्रातील बोरजाई जंगलात गत सहा महिन्यांपासून अवैद्यरित्या सागवानासह अन्य वृक्षांची तोड होणे, वन अधिकारी जंगलतोडीकडे दुर्लक्ष करीत असणे, त्यामुळे वन संपदा कमी होऊन नष्ट होण्याची शक्यता निर्माण होणे, सदर प्रकरणी चौकशी करुन शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : १३ मार्च, २०१३

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.